D-SF-११२


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


**संदर्भ : रासेयो ३६४** **दि : १७ Nov २०२१**

प्रति,
मा.प्राचार्य,
**अशोका एज्युकेशन फाऊंडेशन अशोका सेंटर फॉर बिझिनेस अँड कॉम्प्युटर स्टडीज पत्ता: चांदसी ता.: नाशिक जि: नाशिक पिनकोड: 422013**

**विषय : सन २०२१-२०२२ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाही एकक कार्यक्रम अधिकारी मान्यता.**

महोदय/महोदया,

आपण मान्यतेसाठी पाठविलेल्या रासेयो स्वयंनिर्वाही एकक व कार्यक्रम अधिकारी प्रस्तावानुसार आपल्या महाविद्यालयास अनुक्रमे **१००** अशी एकूण **१०० (शंभर)** विदयार्थी स्वयंसेवक संख्येचे/ची **एक** एकक/के मंजूर करण्यात आले/ली आहे/त. त्यानुसार आपल्या महाविद्यालयातील खालील शिक्षकांना एकक निहाय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता शैक्षणिक वर्ष **२०२१-२०२२** करिता असून पुढील वर्षी नव्याने पुन्हा मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे.

रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांना नव्याने मान्यता मिळाल्यापासून १ वर्षाच्या आत 'ETI , अहमदनगर' येथे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. कार्यक्रम अधिकारी म्हणून मान्यता मिळाल्यानंतर ३ वर्षे सलग राष्ट्रीय सेवा योजनेचे काम केले पाहिजे. तसेच ३ वर्षाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी मान्यता पत्र, प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र व कार्यक्रम अधिकारी कालावधीतील केलेल्या कामाचा संक्षिप्त अहवाल सादर केल्यानंतरच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाणपत्र (Appreciation Certificate) देण्यात येईल. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सन २०२१-२०२२ मधील नियमित कार्यक्रमांचा मासिक,तिमाही,सहामाही व वार्षिक अहवाल व विशेष शिबिराचा अहवाल दिलेल्या वेळेमध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयास ऑनलाइन पाठविण्याची जबाबदारी त्या त्या एककनिहाय कार्यक्रम अधिकाऱ्यांची राहील. रासेयो विभागाने नियुक्त केलेल्या जिल्हा व विभाग समन्वयक यांना आपल्या महाविद्यालयातील रासेयो एककाविषयी व उपक्रमांविषयी वेळोवेळी माहिती देणे आवश्यक राहील.

प्रत्येक रासेयो एककाने दरवर्षी अध्यादेश १६३ बाबत रासेयो स्वयंसेवकांना परीक्षेपूर्वीच अवगत करावे आणि परीक्षेपूर्वीच त्यांचे अर्ज महाविद्यालयामार्फत ऑनलाइन भरणे अत्यावश्यक आहे. याबाबत परीक्षेअगोदर रासेयो स्वयंसेवकांमध्ये जागृती करावी.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध शिबिरे/ स्पर्धांकरिता संघनायक म्हणून विद्यापीठाने नेमणूक केल्यास सदर शिबिरे/ स्पर्धांकरिता आपल्या रासेयो एककातील कार्यक्रम अधिकारी यांना 'संघनायक' म्हणून आपले योगदान देणे गरजेचे असेल. आपल्या सर्वांच्या सामूहिक योगदानावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रभावीपणे कार्यरत आहे, इथून पुढेही संरचनात्मक व संघभावनेचे सहकार्य आपल्या महाविद्यालयाकडून अपेक्षित आहे. सहकार्य करावे,

**नियुक्त झालेले रासेयो कार्यक्रम अधिकारी**

१.सुराणा लोकेश भिकचंद

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

*टिप : केंद्रिय लेखापरीक्षणाच्या वेळी मानधनाकरिता मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.*